
REVIEW OF RESEARCH
ISSN: 2249-894X
IMPACT FACTOR : 5.7631(UIF)
UGC APPROVED JOURNAL NO. 48514
VOLUME - 8 | ISSUE - 9 | JUNE - 2019

# विद्रोही साहित्याचा प्रणेता अण्णा भाऊ साठे

डॉ. संभाजी मलघे
इंद्रायणी महाविद्यालय, तळेगाव, पुणे.

**सारांशः—**

अण्णा भाऊ साठे हरहुन्नरी व्यक्तिमत्त्व अनेक क्षेत्रात त्यांनी आपल्या कर्तृत्वाचा ठसा उमटविला आहे. अण्णाभाऊंना 'शाहिरांचे सरताज', 'साहित्यरत्न' म्हणून नावाजले जाते. साहित्यक्षेत्रातील त्यांची कामगिरी चौफेर स्वरुपाची राहिली आहे.



दारिद्र्याशी सामना करीत त्यांच्या आयुष्याची सुरुवात झाली होती. दारिद्र्यामुळे जेमतेम शिक्षण घेता आले. सर्व शब्दभांडार त्यांनी जीवनाच्या शाळेतून कमावले होते. माणसापुढचा सर्वात मोठा प्रश्न हा भुकेचा प्रश्न असतो. अण्णाभाऊंच्या पुढेही हाच प्रश्न उभा राहिला होता. या पोटासाठी त्यांच्या वडिलांनी मुंबई जवळ केली. वडिलांबरोबर कष्टमय आयुष्य सुरु झाले. काही काळ कल्याणला त्यांनी वडिलांबरोबर कोळसे भरण्याचे काम केले. कधी रस्त्यावरच्या कामगारांसोबत काम केले.

## प्रस्तावनाः—

अण्णाभाऊंनी झोपडपट्टीतलं जीवन अनुभवलं. अठरापगड जातीधर्माची माणसं, त्यांच्या जगण्याचा संघर्ष ते पावला पावलावर पहात होते. त्यांच्या भुकेचे प्रश्न मांडत होते, सोडवण्याचा प्रयत्न करीत होते. कोणत्या जगण्याच्या तत्त्वाज्ञानाने हे 'भुकेचे कोडे' सोडविता येईल? हाच त्यांच्यापुढचा यक्ष प्रश्न होता. मराठी साहित्यामध्ये तर या माणसांचा त्यांच्या जगण्याच्या प्रश्नांचा मागमुसही दिसत नव्हता. हे मराठी बेगडी साहित्य वास्तवापासून शेकडो मैल दूर आहे, याची जाणीव त्यांना केंव्हाच झाली होती. या प्रश्नांच्या सोडवणुकीसाठी झटणारे मार्क्सवादी लेनिनवादी संघटनांशी ते मनाने, विचारांनी जोडले गेले. मनातील विद्रोही विचार व्यक्त करण्यासाठी लेखणीचा भक्कम वापर त्यांनी सुरु केला. 'अण्णाभाऊ' नावाच्या विद्रोहाचा प्रवास सुरु झाला. अण्णाभाऊंची साहित्यसंपदा आणि शाहिरी यामधून शोषितांचे, दलित पीडितांचे, भटक्या—विमुक्तांचे जग आकाराला येऊ लागले.

अण्णाभाऊंचा विद्रोह हा 'वैचारिक विद्रोह' होता. रस्त्यावरची लढाई लढत—लढत केला गेलेला तो संघर्ष होता. तो चळवळीच्या मोर्चांमधून, आंदोलनांमधून, तुरुंगवासामधून केलेला संघर्ष होता.

महाराष्ट्र आणि विद्रोह यांचे नाते स्पष्ट आहे. भालचंद्र फडके यांनी ते असे मांडले आहे— ''महाराष्ट्र ही बंडखोरांची जन्मभूमी आहे. अन्याय, जुलूम यांविरुद्ध बंडाचे निशाण उभे करून, सर्वस्व समर्पण करणाऱ्या थोर बंडखोरांची परंपरा या देशात आहे. अन्याय, द्वेष, वर्चस्व, गुलामगिरी, दारिद्र्य, पारतंत्र्य, हिंसा इ. कुरुपतेने समाजजीवन जेंव्हा कळवंडून जाते तेंवहा बंडाचा झेंडा उभारून जिकडे तिकडे धामधूम उडवून 'सत्त्वाचा उदयोऽस्तु' करावयाची मनीषा महापुरुषांच्या मनात अंकुरते.''[1] अण्णाभाऊ साठे तरी याला अपवाद कसे होणारी.

## कामगार, कष्टकरी, शोषित पीडितांचे जीवन आणि विद्रोहाची जाणीव जागृती :—

अण्णाभाऊंनी एकंदरच दलित, सर्वहारा आणि कामगार कष्टकरी यांच्या जीवनाशी संबंधित सर्वच अन्यायकारक बाबींना आपल्या साहित्यातून जशी वाचा फोडली,

तशीच ती प्रत्यक्ष चळवळीच्या विविध कार्यक्रम–उपक्रमांमधूनही फोडली. अण्णाभाऊंनी स्वतः मार्क्सवादी विचारसरणी अभ्यासली होती, स्वीकारली होती. मार्क्सवादाचे अर्थशास्त्र त्यांना ठाऊक होते. ते म्हणजे– ''मजूर आपली श्रमशक्ती जमीनीच्या कारखान्याच्या वा भ्रमसाधनाच्या मालकाला विकतो. कामाच्या दिवसातील काही भागचा तो स्वतःच्या आणि कुटुंबाच्या पोषणाचा खर्च भागवण्यासाठी उपयोग करतो, म्हणजे मजुरी घेतो आणि दुसऱ्या भागात त्याला मोबदला न घेता राबावे लागते आणि अतिरिक्त मूल्य निर्माण होते. यातूनच भांडवलदाराचा नफा आणि संपत्ती निर्माण होते.''[2] या कडवट अर्थशास्त्रीय सत्याची त्यांना जाणीव होती. जगाची विभागणी दोनच गटात आहे ती म्हणजे– मालक आणि कामगार या कामगारांच्या हक्कांसाठी, मूलभूत हक्कांसाठीच संघर्ष अण्णाभाऊंनी मांडला. आपल्या शाहिरीत ते म्हणतात–

''धनवंतांनी अखंड पिळले
धर्मांधांनी तसेच छळले
मरणाने जणू माणिक गिळले
चोर जाहले साव।''[3]

इथल्या धनवंतांनी, भांडवलदारांनी या कामगार, कष्टकऱ्यांना कायम पिळले आहे. त्याचे कष्ट लुबाडले आहेत. अशा शोषकांविरुद्ध बंड करण्याची वेळ आली आहे, असा विद्रोह ते आपल्या लेखणीतून स्पष्ट करतात. त्यांनी व्यक्त केलेली ही विद्रोहाची भावना कामगार, कष्टकऱ्यांना चेतविणारी आहे, विधायक क्रांती करण्यासाठी भाग पाडणारी आहे. विद्रोहाचे हे स्वरुप वेगळे आहे. आत्माराम कनीराम राठोड यांनी अशा विद्रोहाचे स्वरुप नेमक्या शब्दात मांडले आहे ते असे– ''बापहो, विद्रोह म्हणजे केवळ बंड, केवळ झुंज नव्हे तर त्यांनी बेचिराख केलेल्या आयुष्याची पुनर्बांधणीदेखील होय.''[4] अशी पुनर्बांधणी करण्यासाठी ज्या मांडणीची आवश्यकता असते, ती मांडणी अण्णाभाऊंनी केली आहे. धनवंतांनी गोरगरिबांची, कष्टकरी, श्रमिकांची पिळवणूक केली, आजही करीत आहेत, हा अन्याय दूर करण्यासाठी या व्यवस्थेविरुद्ध विद्रोह करणे अपरिहार्य ठरते. आपल्या टक्क्यांपासून वंचित ठेवल्यामुळे जीवनाची होणारी ससेहोलपट थांबविणयासाठी असा विचारांचा विद्रोह निर्माण करावा लागतो. प्रस्थापित समाजव्यवस्थेच्या विरोधात उभे रहावे लागते.

या व्यवस्थेमधील धनदांडग्यांना वटणीवर आणण्यासाठी विद्रोह करावा लागतो. कामगार कष्टकऱ्यांच्या मनात तो विद्रोह जागृत करावा लागतो.त्यांनी कामगारांना त्यांच्या कष्टाचे मोल समजावून दिले. त्याचप्रमाणे कष्टामागच्या मरणप्राय यातनांची जाणीव धनदांडग्यांना, मालक वर्गाला आणि एकंदरच समाजाला करून दिली. 1985 ला झालेल्या महाराष्ट्र दलित साहित्य संमेलनाचे उद्घाटक म्हणून आपले विचार मांडताना अण्णाभाऊ साठे म्हणाले होते– ''माणूस जगतो का? नी जगण्यासाठी एवढा धडपडतो का? याचा आम्ही विचार करणे जरुर आहे. या धडपणाऱ्या दलिताला आम्ही भित्रा समजू नये. कारण गगनात गेल्यावर विदयुतमस मनोऱ्यावर उभा राहून हा दलित विजेच्या तारा जोडतो. खाणीत उभ्या कड्यावर चढून सुरुंगांना पेट देतो किंवा पोलादाचा रस करणाऱ्या भट्टीवर तो निर्भय वावरतो आणि या सर्व ठिकाणी मृत्यू त्याची वाट पहात असतो. कधीकधी त्याची नी मृत्यूची गाठ पडून हा दलित कष्ट करीत करीत मरण पत्करतो. ही जगण्याची आणि मरण्याची आगळी रीत आहे.''[4] या जगण्याचे मोल ते समस्त कष्टकऱ्यांना समजावून देतात आणि आपल्या श्रमजीवी जीवनाचे मोल खणखणीतपणे मागण्यासाठी त्यांना प्रेरित करतात, विद्रोहाची जाणीव–जागृती करतात.

इथल्या कष्टकरी, शेतकरी, शेतमजूर यांना परिस्थितीची जाणीव करून दिली. अंगात दडलेल्या लढाऊ बाण्याची आठवण केली. गरीब असलो तरी अन्याय सहन करण्याची आपली वृत्ती नाही, आणि परंपराही नाही याचे भान ते या सर्व कष्टकरी कामगार श्रमिकांना शेतकऱ्यांना देतात. आपल्या प्रभावी भाषेतून विद्रोहाची पेरणी करतात ती अशी–

''तू मराठमोळा शेतकरी घोंगडी शिरी
जुनी ती काठी जुनी लंगोटी
बदल ही दुनिया सारी''[5]

असा क्रांतीकारी बदल करण्याचा आग्रह ते धरतात. साऱ्या साऱ्या श्रमिकांची कष्टमय दुनियाच बदलून टाकण्यासाठीचा हा विद्रोह आहे. जुनी कुजकी, जातीयवादी, विकृत, किडकी व्यवस्था बदलून भ्रमाचा, श्रमिकाचा सन्मान करणारी, समानता पाठणारी 'नवी दुनिया' आणावी हे या विद्रोहामागचे धगधगते स्वप्न आहे. 1958 च्या दलित साहित्य संमेलनात त्यांनी एक विद्रोही, क्रांतीकारक विचार मांडला होता, तो विचार म्हणजे– ''पृथ्वी ही शेषाच्या मस्तकावर नव्हे तर दलितांच्या तळहातावर तरते. ह्यामधील दलित हा शब्द त्यांनी अत्यंत व्यापक अर्थाने वापरला होता. दलित म्हणजे कामगार, कष्टकरी, शोषित, पीडित, उपेक्षित, वंचित, सर्वहारा, सर्व श्रमिक या अर्थाने तो वापरला होता.''[6] ही सारी दुनियाच श्रमिकांच्या श्रमावर जगत आहे, ही जाणीव अण्णा भाऊंनी समस्त कामगार, कष्टकऱ्यांना करून दिली आहे. म्हणजे कामगार, कष्टकरी आहेत, त्यांचे कष्ट आहेत, म्हणून जगातले राहिलेले लोक जगतात हे विचारच विद्रोहक आहेत. आपल्या अस्तित्वाचे, कष्टाचे श्रमाचे, घामाचे हे अत्यंत अचूक मूल्यमापन आहे. शेष नाग नाकारणे म्हणजेच जुन्या धारणा, धार्मिक कल्पना, परंपरागत आंधळे विचार यांचा आधार नाकारणे होय. आजवर असल्या भाकड कथांनी समाजाची धूळफेक केली. वेगळा विचारच कधी करू दिला नाही. याला जबाबदार असणाऱ्या साऱ्याच गोष्टींना अण्णाभाऊंनी एका फटक्यात उडवून लावले आहे. त्यांच्या विचारातच दाहकता आहे, विद्रोह आहे. हा विद्रोह वास्तवाची जळती जाणीव करून देणारा आहे.

## साहित्यिकांमध्ये केलेली विद्रोह जाणीव जागृती :–

अण्णाभाऊ साठे यांनी साहित्यिकांना विद्रोहाची नवी जाणीव करून दिली आहे. अण्णाभाऊंनी आपल्या साहित्यामधून तळागाळातल्या माणसाचे जीवन त्यांच्या वृत्ती–प्रवृत्तींसह टिपले आहे. अण्णाभाऊंची साहित्य संपदा अशी आहे. 1. कादंबऱ्या–35 2. कथासंग्रह–13 3. लोकनाट्ये–13 4. पोवाडे–15 5. नाटके–3 6. चित्रपटकथा – 07 आणि 7. प्रवासवर्णन–1

या आपल्या साहित्यामधून 'समाजव्यवस्थेतील सर्वात तळाच्या माणसाचे जीवन रेखाटले आहे. त्यांच्या साहित्यामधून फकीरा मांग, सत्तू भोसले, नाथा पाटील, विष्णूपंत कुलकर्णी, जमीनदार सावकार, गोरी मेरी ह्या व्यक्तिरेखा जशा येतात. त्याचप्रमाणे भाकडवाला व्यंकू, बोटं गभावणारा कामगार–भीमा, बरबादया कंजारी, स्वातंत्र्यसेनानी गुरुजी, गवळण म्हणणाऱ्या गवळणी, तमासगीरीन, यांचे चित्रण पहायला मिळते. अठरा–पगड जातीची विविध प्रकारची माणसे त्यांनी साहित्यात अमर करून ठेवली आहेत अण्णाभाऊ या माणसांविषयी, त्यांच्या जीवनाविषयी, त्यांच्या जगण्या–मरण्याविषयी अत्यंत संवेदनशील आहेत. ही माणसे त्यांना कायम 'आपली' वाटतात. म्हणूनच त्यांचे जीवन त्यांना आकर्षित करते. हे विशाल जग चित्रित करण्याचे आवाहन ते साहित्यिकांना करतात. नव्या जगासाठी या माणसांचे जगणे सर्वांसमोर आणणे त्यांना अत्यंत आवश्यक वाटते. कारण हे जीवन पाहिल्याशिवास 'माणसामधला माणूस' जागा होणार नाही, म्हणून साहित्यिकांनी सजगपणे या माणसांचा जीवन संघर्ष मांडावा असे आवाहन अण्णाभाऊ साठे करतात. उदयाच्या विद्रोहासाठी हे मांडणे त्यांना आवश्यक वाटते.

दलित साहित्याचे अभ्यासक बजरंग कोरडे यांनी अण्णाभाऊ साठे यांच्या साहित्यातील 'विद्रोहाचे स्वरूप' स्पष्ट करून सांगितले आहे. ''अण्णाभाऊंची वगनाट्ये, लावणी, कथा व कादंबऱ्या या सर्व साहित्य प्रकारात जातीवर्ग, स्त्री दास्याचा नेमकेपणाने वेध घेतला. मुंबईच्या लावणीत लाल झेंडा हाती घेऊन क्रांती करणाऱ्या मजुरांच्या नव्या पिढीला प्रेरणा मिळते. भारतीय समाजव्यवस्थेने दिलेली दुःख, असहायता, व्यसने यामागील शोषणाच्या व्यवस्थेचा शोध अण्णाभाऊ घेतात. त्यांच्या कथांचे सूत्र श्रमजीवी विरुद्ध पांढरपेशे, साम्यवाद्यांच्या परिभाषेत प्रोसेसिएट विरुद्ध बुर्झ्वा असेच आहे. अण्णाभाऊंची 'स्मशानातील सोने' ही कथा समाजव्यवस्थेने दिलेली गरिबी, माणसाला कुठल्या थरावर पोहचवते यांचे संवदेनशील चित्रण आहे. 'इनामदार' नाटकाची मध्यवर्ती संकल्पना जमीनदार या शोषकाविरुद्ध शोषित गावकऱ्यांनी दिलेल्या संघर्षाची कथा आहे. या साहित्यकृतीला वर्गसंघर्षाचे परिणाम आहेत. अण्णाभाऊंच्या 'आवडी' या कादंबरीत जातीअंताचे सूत्र प्रतीत होते.''[7]ह्या सर्व विद्रोहाच्या ठिणग्या आहेत. या ठिणग्यांना कॉ. अण्णाभाऊ साठे यांनी खूप मोलाचे मानले आहे. या ठिणग्यांची पुढे अग्निलोळात रुपांतर होते अशा अण्णाभाऊंची धारणा राहिली आहे. शोषितांमधून जे कुणी समाज पुढे येईल त्याप्रत्येकाला हा व्रिदोहाचा विचार त्यांनी दिला आहे. अण्णाभाऊंनी आपल्या साहित्यामधून अठरा पगड जातीची माणसे वर्णन करून सांगितली. अण्णाभाऊ म्हणतात या माणसांविषयी, त्यांच्या जगण्याविषयी मला कमालीची आस्था आहे. कारण हे सर्व माझे लोक आहेत. या लोकांचे कष्टमय जीवन हे आनंदमय करायचे असेल तर क्रांतीच करावी लागेल. क्रांती आणि विद्रोह यांमध्ये प्रखर नाते ते स्पष्ट करतात.

''लाल झेंडा घेऊन हाती
करावया येथे क्रांती
मजुरांची पिढी नवं पाऊल टाकिती
अण्णाभाऊ साठे म्हणे
बदलून टाका दुबळे जीणे
होणार विजयी ते रण करती।।''[8]

अशा दुबळ्यांचे जीणे बदलून टाकणारे क्रांतीकारक कार्य करा, लेखणी तळपती ठेवा हा संदेश विद्रोह पेटविणारा आहे.

## 'महाराष्ट्र अस्मिता' जागृतीसाठी 'विद्रोह विचार मांडणी' :–

महाराष्ट्रातील 'महाराष्ट्रीय' म्हणून एक अस्मिता आहे. ही अस्मिता नेमकी कशी आहे? याची स्पष्ट ओळख अण्णाभाऊंनी करून दिली आहे. 'संयुक्त महाराष्ट्र चळवळ' हे या महाराष्ट्राच्या इतिहासातील धगधगते, प्रेरक, आणि विद्रोहक असे पर्व आहे. हे पर्व घडविण्यात कॉ. अण्णाभाऊ साठे यांचा फार मोठा वाटा आहे. महाराष्ट्रापासून मुंबई तोडण्याचा डाव होता. हा हाणून पाडण्याची महाराष्ट्राची अस्मिता जपणारे धुरंधर नेते, पत्रकार आणि शाहीर पुढे सरसावले होते. या लढ्यात अण्णाभाऊ, शाहीर गवाणकर, शाहीर अमर शेख यांनी मोठी कामगिरी बजावली होती. याचा लेखाजोखा संबंध महाराष्ट्राला माहीत आहे. या धगधगत्या दिवसातील शाहीरांच्या कार्यक्रमांचे स्वरुप शाहीर अमर शेख यांनी स्पष्ट केले आहे, ते असे– ''पहाटेचे पुढाऱ्यांची धरपकड झाली म्हणून अधी मुंबई बंद कामगार मैदानावर निषेध सभा. मी गाणी म्हटली. हजर लोक पंचवीस हजार. नंतर युवक सभेतर्फे शिवाजी पार्कच्या सभेला मी गेलो. श्री. न. वि. गाडगीळ यांचे भाषण श्रोत्यांनी बंद पाडले. मी 'गर्जा संयुक्त महाराष्ट्र भारती' हे म्हणण्यासाठी पुढे गेलो. समोरच्या तीन लाखाचा जमाव माझा कोरस झाला. गाणे संपताच मी विनंती केली. 'संयुक्त महाराष्ट्रवादी कुणीही असो, जो सभा मोडेल तो मराठी रक्ताचा नाही? लोकांनी मान दिला.''[9] असा मान या शाहिरांच्या वाट्याला आला, कारण मराठी अस्मिता किंवा संयुक्त महाराष्ट्राची अस्मिता जागृत करण्यासाठी समस्त शाहिरांनी आपली शाहीरी विद्रोहाने धगधगती केली होती. या लढ्यात अण्णाभाऊ साठे आघाडीवर होते. या काळातली त्यांची शाहीरी अधिक फुलली होती, विद्रोही झाली होती. 'माझी मैना' या प्रतीकामधून त्यांनी समस्त महाराष्ट्रीय मनाचं दुखणं मांडलं. 'मुंबईच्या लावणीला' लोकांनी डोक्यावर घेतलं. कारण मराठी मनाची अस्मिता. 'महाराष्ट्र अस्मिता' जागृत करण्याचे काम अण्णाभाऊंच्या या लावणीने केले होते. विद्रोह पेटविण्याचे काम केले होते.

आपल्या लावणीत अण्णाभाऊ म्हणतात–

''ही मुंबई यंत्राची–तंत्राची
जगणाऱ्याची मरणाऱ्याची
शेंडीची–दाढीची हडसनच्या गाडीची
नायलॉन अन् जॉर्जेटच्या साडीची
बुटाची जोडीची, पुस्तकाच्या थडीची
पैदास इथं बहु ऐतखाऊची
शिरजोराची, चोराची, भांडवलदारांची
अन हरायरा
पाण्यानं भरलं माझं खिसं
वाण मला एका छत्रीची
त्या समयास उसळली चळवळ संयुक्त महाराष्ट्राची
बेळगाव निपाणी गोव्यासह एका भाषिक राज्याची
फौज उठली बिनीवरची।
शेतकऱ्यांची कामकऱ्यांची मध्यमवर्गीयांची

आला मैदानी त्वेष
वैरी करण्या नामशेष
गोळी डमडमची छातीवर सायली।''[10]

अशी अस्मिता जागृत करण्यासाठी विद्रोहाचाच आधार घ्यावा लागतो. अण्णाभाऊंनी याच विद्रोहाचा आधार घेतलेला दिसतो.

## मानवतेसाठी, समतेसाठीचा विद्रोह :–

अण्णाभाऊंनी केलेला हा संघर्ष मानवतेसाठी, समतेसाठी केलेला हा विद्रोह आहे, म्हणूनच तो व्यापक आहे, अतीभव्य आहे. संपूर्ण मानवजात सुखी–समाधानी व्हावी यासाठी हयातभर केलेला आटापीठा आहे.

इथली विषमता भयाणक आहे. या विषमतेला गाडल्याशिवाय समता येणार नाही, त्यामुळे इथला सर्वात शेवटचा माणूस जागा झाला पाहिजे. या क्रांतीसाठी जगातल्या विचारवंतांचे विचार कामी येणार आहेत. ह्या क्रांतीनंतर सगळ्याचे जणे बदलून जाणार आहे. कष्टकऱ्यांचे राज्य येणार आहे.या नव्या राज्यात मानवता असेल. या देशात आर्थिक समानता असेल. अशा समतामय जगाच्या निर्मितीसाठी संघर्ष करावा लागणार आहे.

संयुक्त महाराष्ट्र चळवळी ही अस्मितेची चळवळ होती. म्हणूनच अण्णाभाऊ साठे या चळवळीत आपले सर्वस्वपणाला लावून झुंजत होते. या चळवळीसाठी त्यांनी आपली लेखणी अधिक धारदार केली. सभा, मोर्चे, आंदोलने यामध्ये ते आघाडीवर राहिले. त्यांच्यावर सरकारची करडी नजर होती. तरीही ते डगमगले नाहीत. तीन महिन्याचा तुरुंगवास त्यांना भोगावा लागला. हे सारे केवळ एका अस्मितेसाठी नव्हते. समता तत्त्व हरल्यामुळे हतबल झालेल्या माणसांना स्वत्व, स्वाभिमान पुन्हा मिळवून देण्यासाठीचा तो लढा होता. बहुजन समाजाला नवी ओळख मिळवून देण्यासाठीची ती लढाई होती. ती नव्या जगासाठीची लढाई होती. म्हणून अण्णाभाऊ म्हणतात–

''त्या तुझ्या जुन्या खोपीत
समतेचा पाळणा हले
एकीने वाढवून त्याला
कर खरे ब्रीद आपुले
पळू नको रे पळू नको रे
बदल ही दुनिया सारी।''[11]
हा या व्रिदोहाचा गाभा आहे.

डॉ. आंबेडकरांनी हे जग घाव घालून बदलण्याचे सर्वांना सांगून गेले आहेत. इथल्या धर्मांधतेवर, अज्ञानावर आशिक्षिततेवर, अज्ञानावर, दारिद्र्यावर, उच्च–नीचतेच्या कल्पनेवर, जातीव्यवस्थेवर घाव–घालून घालून नवी समाजरचना निर्माण करावयाची आहे. याची जाणीव अण्णाभाऊंनी कायम धगधगत ठेवली. आपल्या आतमध्ये हा विद्रोहाचा ज्वालामुखी कायम उफळता ठेवला, म्हणूनच त्यांच्या साहित्याला समाजव्यवस्था बदलणाऱ्या झळाळीचे मोल आले आहे. डॉ. आंबेडकरांच्या झुंजार लेखणीप्रमाणे आपली लेखणी त्यांना या शोषित, वंचितांच्या कल्याणासाठी उपयोगात आणली. यामागे त्यांचा विद्रोह, विद्रोही विचारधारा आहे असे ठामपणे म्हणता येते.

## संदर्भ :–

1. फडके भालचंद्र, 'दलित साहित्य वेदना व विद्रोह' श्रीविद्या प्रकाशन, पुणे दुसरी आवृत्ती–1989, पृ.42
2. पानसरे गोविंद, 'मार्क्सवादाची तोंड ओळख' श्रमिक प्रतिष्ठान, कोल्हापूर, प्रथमावृत्ती–2010, पृ.55
3. गिते गंगाधार, 'जग बदल घालुनि घाव अर्थात अण्णाभाऊंची शाहीरी' मूलनिवासी पब्लिकेशन ट्रस्ट पुणे, द्वितीयावृत्ती–2010, पृ.16
4. राठोड आत्माराम कनीराम, 'पाचवे विद्रोही साहित्य संमेलन, नंदूरबार, प्रकाशक विद्रोही सांस्कृतिक चळवळ, महाराष्ट्र, पृ.11
5. गिते गंगाधर, उपरोक्त, पृ.18

6. बरसमवाडा विठ्ठल गणपतराव, 'इतिहासातील हिरे माणिके' कल्याणी प्रकाशन, अहमदनगर प्रथमावृत्ती–2013, पृ.169
7. डॉ. कसबे मिलिंद, 'कॉ. अण्णाभाऊ साठे' दुसरे साहित्य संमेलन (स्मरणिका), पृ.69
8. गिते गंगाधर, उपरोक्त, पृ.21
9. साने रविकिरण, 'लढा संयुक्त महाराष्ट्राचा' डायमंड पब्लिकेशन्स पुणे, प्रथमावृत्ती–2009, पृ.
10. गिते गंगाधर, उपरोक्त, पृ.28
11. गिते गंगाधर, उपरोक्त, पृ.19

LBP PUBLICATION